जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया एम.ए.

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया बी.कॉम.

❖ वर्ष ४८ वे ❖ अंक १२ वा ❖ ऑगस्ट २०१७ ❖ वीर संवत २५४३ ❖ विक्रम संवत २०७३

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● ।। जिनेश्वरी ।। अध्याय १५ : सभिक्षुक | १५ |
| ● वाणीभूषण श्री प्रीतिसुधाजी म.सा. अमृत महोत्सव, पुणे | १९ |
| ● गुरु आनंद कार्यक्षम पत्रकार पुरस्कार - श्री. संजय व सौ. सुनंदा चोरडिया | २७ |
| ● सन्तोकतारा जैन चॅरिटेबल ट्रस्ट, जयपूर | ३१ |
| ● कव्हर तपशील | ३२ |
| ● चातुर्मास को ऐतिहासिक बनाने से पहले अध्यात्मिक बनाएँ | ४१ |
| ● अच्छे बच्चों की अच्छी बाते | ४३ |
| ● उग्रतप की शोभा शान्ति | ४५ |
| ● क्षमा : उद्पद्यते शान्ति : | ४७ |
| ● ऊसर भूमि में बीज मत बो | ४९ |
| ● मृत्यु को महोत्सव बनाएँ - आत्म चिन्तन | ५१ |
| ● कैसे बसाएँ बेटी का घर | ५३ |
| ● सुक्ति से मुक्ति - आलोचना | ५४ |
| ● धन्यवाद... धन्यवाद... धन्यवाद... | ५४ |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये 'जैन' लिहा | ५५ |
| ● पर की आशा..... सदा निराशा | ५७ |
| ● आदमी मजाक है..... (१) | ५८ |
| ● आपके व्यवहार से किसी को असंतोष तो नहीं ? | ७३ |
| ● मैत्रीच्या पाऊलखुणा | ७४ |
| ● हास्य जागृति | ७७ |
| ● पंचपरमेष्ठी मंत्र - पाच वर्ण आणि आरोग्य | ७८ |
| ● चलो साथियों जैन उपाश्रय | ७९ |
| ● श्रीमद् राजचन्द्र १५० वी जन्मजयंती - अहमदाबाद | ८१ |
| ● नये युग की आलोचणा | ८५ |
| ● आचार्य हस्ती अहिंसा शोध संस्थान | ८६ |
| ● भारतीय जैन संगठन - योगदान | ८७ |
| ● लिव्हिंग व ट्रान्सफर सर्टिफिकेट निवेदन | ८९ |
| ● Lila Poonawala Foundation | ९१ |

- चि. तनिषा चोपडा, पुणे ९१
- महावीर प्रतिष्ठान, पुणे – गर्ल्स हॉस्टेल ९३
- जाहीर शतावधान – पुणे, १५ ऑगस्ट ९५
- जैन संथारा भूमी, पुणे ९६
- अरिहंत जागृति मंच, पुणे ९६
- दी पूना मर्चन्टस् चेंबर १०७
- सुशील आगम ज्ञान प्रतियोगिता १०९
- ओम जय आनंद डायलेसिस सेंटर – थेरगाव १११
- आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहमदनगर ११३
- आनंदऋषिजी जन्मोत्सव, सिकंदराबाद ११४
- प्रदुषण म्हणजे संकटाला आमंत्रण ११६
- डायमंड डायरी ११९
- हवाय एक मुरारीलाल १२३
- गागर में सागर १२५
- विविध बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित, एकूण अंक १२

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये.

- www.jainjagruti.in
- www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति - वर्गणीचे दर

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA
Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146
IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११४०९

❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१

❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८

❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५

❖ **मार्केटयार्ड, पुणे –** श्री. प्रमोदकुमार शांतीलालजी छाजेड, मो. : ९८८१८७३७१०

❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७

❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०

❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६

❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१

❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४

❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२११३००५५९

❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६

❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६

❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२

❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०

❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०

❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७

❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१

❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३

❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०

❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५

❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४

❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२

❖ **श्रीरामपूर** –श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७

❖ **लासलगाव –** श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ७७७४९३८०३२

❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०

❖ **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७

❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५

❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६

❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६

❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८

❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८

❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२५४२२५३

❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.** *(क्रमशः)*

## अध्याय १५ – सभिक्षुक

कोणाला म्हणायचे भिक्षुक ? कोणाला म्हणायचे साधू ? कसे असावे त्याचे आचरण, विचरण ?

**भिक्षुकांची आचारसंहिता**

साधू हा बोलीभाषेतला शब्द आहे. शास्त्रामध्ये भिक्षुक हा शब्द आहे. भिकु शब्दाचा सामान्य अर्थ म्हणजे भिक्षा घेणारा पण असे मानले तर जगातील सगळे भिकारी या वर्गात येतील, परंतु बंधूंनो परमात्मा सांगतात, भिक्षुक म्हणजे भीक मागणारा नाही तर धर्माचा स्वीकार करून मौन होऊन जगतो, अंतर्मुख होऊन आचरण करतो. तो भिक्षुक जो भिक्षुक कर्माचा स्वीकार करून, गुलाम होऊन मौन होतो तो मजुरी करू शकतो पण मालकी नाही करू शकत त्याला भिक्षु म्हणता येणार नाही.

**मोणं चरिस्सामि समिच्च धम्मं,** – धर्माचा स्वीकार करून जो मुनी होतो तो भिक्षुक. त्याचबरोबर जो सरळ असतो, ज्याला दोन मुखवटे नसतात, अंतर्बाह्य एकच असतो तो भिक्षुक.

**नियाणछिन्ने** – नियाणाला ज्यांनी समाप्त केले, जे नियाणारहित असतात, बदल्यात न मागणारे असे भिक्षुक असतात.

**अकामे कामे**.. हा खूप सुंदर शब्द आहे. भिक्षु कशाची कामना करतात ? भिक्षु कामना करतात ती निष्काम होण्याची आणि जे जे अज्ञात आहे त्याची गवेषणा करण्याची त्याचा शोध घेण्याची.

या अध्यायातील एक एक शब्द अर्थपूर्ण सुंदर आहे. भगवंतांनी आदर्श भिक्षुकाच्या परम उज्ज्वल धवल स्वरूपाचे वर्णन या अध्यायात केले आहे त्या भिक्षुकाची जीवनचर्या, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन त्याची विवेकपूर्ण विचारसरणी संयमित व्यवहार करणी कशी असावी ? हे समजवताना भगवंत प्रबोधन देतात..

**याचक आहे पण भिकारी नाही**

भिक्षुका ! तुला सर्व काही मागण्याचा अधिकार आहे कारण मागण्यानेच जीवन यापन होणार आहे, पण मागताना सावधान रहा.. मागितल्या शिवाय घेणं चोरी आहे, पण काय मागायचं हे ठरवायचं... ! लक्षात घे .... तीच वस्तू तोच पदार्थ मागायचा की ज्याच्यावाचून काम चालणारच नाही, अतिशय आवश्यक अनिवार्य असेल तेच माग.... जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक आहे त्याचीच याचना कर अन्यथा ते मागणं यातना होईल व भिक्षुकाचं नव्हे तर भिकाऱ्याचं चरित्र निर्माण करेल. म्हणजे पहा संपत्ती शिवाय जीवन यात्रा चालू शकते मग ती कशाला मागायची ? पण भाकरी विना जगणे अवघड मग ती मात्र मागून घ्यावी. अन्न–वस्त्र–निवारा अगदी समर्थपणे सन्मानाने मागून घ्यावा. मागावे पण गया वया करून मजूर बनून मागू नये. मागावे ते मालक बनुन, सन्मानाने मागावे. मागणे असे असावे की देणाऱ्याला आनंद व्हावा व घेतानाही आनंद व्हावा.

भिकारी बनुन घ्याल तर भीक दान ठरेल व देव बनून घ्याल तर भिक्षा वरदान ठरेल.

सभिक्षुक म्हणजेच सच्चा – भिक्षुक, समर्थ भिक्षुक, आदर्श भिक्षुक कसा असावा याचे निरूपण

भगवंत देतात. या अध्यायातील शब्दांनी, सिध्दांतानी स्वत:च्या जीवनपटावर दृष्टी ठेवली तर जीवनात प्रकाशाचा झोत प्रवाहित होईल व अंधकार तिरोहीत होईल. या सिध्दांताचे विश्लेषण करतांना भगवंत सांगतात की, परम मौन अवस्था अर्थात प्रतिक्रियाशून्य अवस्था मौन म्हणजे सत्याची. वास्तवाची समज व ज्याला खरी समज येते ती प्रतिक्रिया - प्रतिकार न करता सहकार - सहज स्वीकार करतो. हे स्पष्ट करताना भगवंत उपदेश देतात की भिक्षुक कुणाच्या अंगणात भिक मागण्यासाठी गेला व त्या गृहस्थाने वस्तु व पदार्थ दिला किंवा दिला नाही, सन्मान केला व अपमान केला. तरीही जो विचलीत होत नाही. सदानंदी राहतो तो आदर्श भिक्षुक, तोच खरा भिक्षुक.

जे बाह्य परिचय सोडून अंतरमनाचा वेध घेण्याची जिद्द ठेवतात ते भिक्षुक असतात कारण जन्म - जन्मांतरापासून बाह्य परिचय केल्याने कर्म संचयच जास्त होतो, क्षय मात्र अजिबात होत नाही. म्हणून भिक्षुकाला आंतरदृष्टी ठेवण्याचे विधान केलेले आहे.

**अन्नायएसी परिव्वए स भिक्खु ।**

पूर्वी कधी समजलं-उमजलं-जाणलं नाही त्याचा शोध अज्ञानाचा बोध घेण्यास जो समर्थ असतो तो आदर्श भिक्षुक असतो.

**पन्ने अभिभूय सव्वदंसी जे कम्हिवि**
**न मुच्छिए स भिक्खू**

अतिशय गहन सखोल - सार्थ सूत्र आहे हे पन्ने म्हणजे प्रज्ञा, बुद्धि ज्याची प्रज्ञा जागृत आहे. अभिभुय - जो पराजित होत नाही, ज्याला फक्त जिंकणेच माहिती असते. सव्वदंसी - सर्वदर्शी - जो सर्वदर्शी असतो. जो सदैव भानावर असतो, जो अनुकूल अथवा प्रतिकूल परिस्थितीतही बेहोष, बेभान होत नाही. प्रतिकूल संयोगात मन व्याकूळ होत नाही व अनुकूल संयोगात हर्षातिरेक करीत नाही, तो खरा साधू.

**तेसिं इहलोहिय फलट्ठा जो संथवं न करेइ सभिक्खु**

जो देणाऱ्याशी, दात्याशी परिचय संबंध ठेवत नाही तोच आदर्श कारण की हाच परिचय व्यक्तिला कुठे न कुठे बंधनात आणतो.

**पंतकुलाइं परिव्वए स भिक्खु ।**

त्याला जसा आहार मिळतो, जशी भिक्षा मिळते, रूक्ष-गार गरम-शिळी ती सहजभावाने स्वीकार करतो, उद्विग्न होत नाही तो आदर्श भिक्षुक असतो.

**अव्वग्गमणे असंपहीट्ठे, जे कसिणं अहियासए स भिक्खु**

जो एखादी गोष्ट पूर्णपणे ग्रहण करतो अर्धे ग्रहण केले, अर्धे सोडून दिले असे नाही. जो समग्रतेचा स्वीकार करतो तो खरा भिक्षु.

**नो सक्कियमिच्छई न पूयं,**
**नो विय वंदन गं कुओ तसंसं ।**

जो कुठल्याही सत्काराची इच्छा करीत नाही. पूजा करवून घेण्याची कामना करीत नाही, वंदना करविण्याचा आग्रह नाही प्रशंसेची ही आवश्यकता नाही.

**नर - नारिं पजहे सया तवस्सी ....**

असे नर - नारी म्हणजेच स्त्री - पुरूष की ज्यांच्यामुळे साधना खंडीत होईल अशांच्या संपर्कात जो रहात नाही.... ज्यांच्या संपर्कामुळे मोह जागृत होईल अशांच्या संपर्का पासून जो स्वत:चा बचाव करतो, तो साधू..

**जे विज्जाहीं न जीवइ स भिक्खु ।**

जो कोणत्याही प्रकारच्या विद्येचा, मंत्रविद्येचा, ज्योतिष विद्येचा, दंडविधान किंवा वास्तुशास्त्र विद्येचा उपयोग - प्रयोग स्वत:च्या उपजीविकेसाठी करत नाही, तो खरा भिक्षू.

भिक्षुकांच्या आदर्श आचारसंहितेची महिमा सांगणाऱ्या या अध्यायात भगवंतानी सर्व गोष्टी विस्ताराने सांगितल्या आहेत. भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे दिव्य

– भव्य स्वरूप जर भिक्षुकाने अंगीकारत आत्मसात केले तर आनंदाने घन जीवनात बरसतील व परमसिध्दीचा मार्ग सुकर होईल.

बंधुंनो, भगवंतानी या अध्यायात सोळाच श्लोकात भिक्षुच्या आदर्श संहितेचं समग्र विश्लेषण केलेले आहे, परंतु ते ऐकताना, वाचताना स्वत:ला त्या दर्पणात त्या आरशात पहायचय. भगवंताच्या या दर्पणात दुसऱ्याला पाहू नका चुकूनही मनात विराधना येऊ देऊ नका. यातील सूत्र दुसऱ्याच्या जीवनचर्येशी पडताळून पाहू नका 'अरे भगवंत तर असं सांगतात व हे भिक्षु असे वागतात' अरे ! यानी अस वागायला हवं...

भाविकांनो, चुकूनही मनात असे विचार येऊ देऊ नका, आपले डोळे, आपली बुद्धि, आपला मार्ग पाहण्यासाठी वापरा, दुसऱ्यांच्या मार्गातील काटा बनू नका.दुसऱ्यांच्या चरित्रातील उणीवा शोधत रहाल तर तुमची आराधना विराधनेत बदलेल व दुसऱ्यांच्या सिद्धी मार्गातही अडथळा बनाल.

आदर्श भिक्षु भगवंताच्या या दर्पणात स्वत:चे चरित्र न्याहळतो तेव्हाच त्याचा सिध्दीचा मार्ग उजळतो. *(क्रमश:)* ●


महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वात खात्रीशीर, सर्वात सोपा व सर्वात स्वस्त मार्ग...

जैन जागृति



## पर्युषण पर्व - क्षमा पर्व
## जैन जागृति - पर्युषण अंक

जैन धर्मात ''पर्युषण पर्व'' सर्वांत महत्त्वाचा उत्सव पर्व आहे. संवत्सरीच्या वेळी व्यक्ति संपुर्ण जीव जगताला क्षमा देतो व क्षमा घेतो.

जैन जागृतित क्षमापनाची जाहिरात देऊन आपण जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचता. जैन जागृतित जाहिरात देऊन जैन समाजाशी संवाद साधा.

**पर्युषण अंकासाठी २० ऑगस्ट २०१७ पर्यंत जाहिरात पाठवा**

| आर्ट पेपर वर रंगीत (Colour) जाहिरात | |
|---|---|
| ● पूर्ण पान | ● रु. ८५००/-* |
| ● १/२ पान | ● रु. ४६००/-* |
| *डिझाईन व पॉझेटिव्ह खर्च वेगळा (रु. ७००/-) | |
| ● GST 5% Extra | |

| व्हाईट पेपरवर एका रंगात (Black & White) जाहिरात | |
|---|---|
| ● पूर्ण पान | रु. ४०००/- |
| ● १/२ पान | रु. २४००/- |
| ● १/४ पान | रु. १२५०/- |
| ● १/८ पान | रु. ८००/- |

आजच्या स्पर्धेच्या युगात जाहिरात ही अत्यावश्यक बाब झाली आहे. जैन समाजात ''जैन जागृति'' हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात ''जैन जागृति'' मध्ये द्या. – संपादक

## जैन श्रावक संघ, आनंद दरबार, पुणे

# ''गुरु आनंद कार्यक्षम पत्रकार पुरस्कार''

## जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी चोरडिया व सौ. सुनंदा चोरडिया





श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ-दत्तनगर, बालाजीनगर, वारजे माळवाडी, संतोषनगर, धनकवडी, पद्मावती नगर, हे सर्व संघ मिळून कात्रज-दत्तनगर रोड, आगम मंदिर पायथा, पुणे-४६ येथील आनंद दरबारात श्रमण संघीय सलाहकार प.पू. श्री. दिनेशमुनिजी म.सा., डॉ. द्वीपेंद्रमुनिजी म.सा., डॉ. पुष्पेन्द्रमुनिजी म.सा. आदी ठाणा - ३ यांचा चातुर्मास विविध कार्यक्रमाद्वारे संपन्न होत आहे.

राष्ट्रसंत आचार्य भगवंत प.पू.श्री. आनंदऋषिजी म.सा. यांच्या ११७ व्या जन्मजयंती निमित्त २३ जुलै रोजी ''गुरु आनंद कार्यक्षम पत्रकार पुरस्कार'' देण्यात आला. जैन जागृति मासिकाचे संपादक श्री. संजयजी कांतीलालजी चोरडिया व सौ. सुनंदा चोरडिया तसेच लोकमत वर्तमान पत्राचे पत्रकार श्री. बजरंगजी निंबाळकर यांना पत्रकार पुरस्कार देण्यात आले. तसेच रिदमिक जिमनॅस्टिक स्पर्धेत विशेष कार्य केल्याबद्दल चि. तनिषा नितिनजी चोपडा यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आमदार श्री. भीमराव तापकीर, कात्रज डेअरीचे एम.डी. डॉ. विवेकजी क्षीरसागर, स्थानिक नगरसेवक श्री. वसंतजी मोरे, श्री. युवराजजी बेलदरे, सौ. स्मिता कोंढरे, अमृता बाबर, नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले, जैन कॉन्फरन्सचे पदाधिकारी श्री. अभयजी संचेती, श्री. सागर साकला, श्री. अनिलजी भन्साळी, उद्योगपती श्री. किर्तीकुमार दुगड, श्री. बाळासाहेब धोका व सर्व संघाचे संघपती इ. मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब धोका यांनी प्रस्तावना करुन सत्कारमुर्तीचा परिचय सभेला करुन दिला. श्री. अभयजी संचेती, श्री. सागरजी साकला, नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले यांनी आपल्या भाषणात सत्कार मुर्तीचा गौरव केला.

यावेळी आमदार तापकीर यांनी सांगीतले की पत्रकारीता असो किंवा कोणत्याही कामासाठी दिलेला पुरस्कार त्या कामासाठीची जबाबदारी वाढवत असून त्यामध्ये पुरस्कार देणाऱ्याला तसेच घेणाऱ्याला त्यातून आनंद मिळत असतो तसेच या गुणगौरवाने काम करण्याची उर्जा निर्माण होत असते.

प.पू.श्री. दिनेशमुनिजी म.सा. यांनी सांगितले की देशातील राजकारण सुरळीत चालवण्यासाठी तसेच सामान्य नागरीकांना न्याय हवा असेल तर माध्यमांची भूमीका महत्त्वपूर्ण आहे. सर्व प्रकारची माध्यमे ही आरशासारखी भूमीका पार पाडत असतात. कोणत्याही

दबावाला बळी न पडता दिलेली बातमी नागरिकांना न्याय देत असते. पत्रकारावर सर्वच प्रकारचे प्रेशर किंवा दबाव असताना देखील आपली भूमीका पार पाडत असतात. व पत्रकारांच्या हिमतीलाच किंमत असून त्याला दाद दिली पाहिजे. पत्रकरांचा सन्मान केला पहिजे.

श्री. दिनेशमुनिजी म.सा. यांनी जैन जागृति मासिक व चोरडिया परिवाराबद्दल विशेष गौरवोद्गार काढले. गत ४५ वर्षापासून मी स्वतः हे मासिक पहात आहे. जैन जागृति मासिक सुरु झाले तेव्हा गुरुवर श्री. पुष्कर मुनिजी म.सा. व श्री. देवेन्द्र मुनिजी म.सा. यांचे महाराष्ट्रात विचरण होते. श्री. कांतीलालजी चोरडिया यांनी २ ते ३ वेळेस गुरुवरांना भेटून आशिर्वाद घेतले होते. श्री. कांतीलालजी यांनी अतिशय कष्ट करुन जैन जागृति मासिक नावारुपाला आणले आहे. श्री. कांतीलालजी नंतर चोरडिया परिवाराची दुसरी पिढी आपल्या पुरुषार्थाने मासिक प्रकाशनात उच्च शिखर गाठले आहे. त्यांचे हे कार्य प्रशंसनीय व पवित्र कार्य आहे.

महाराष्ट्रात विचरण करताना सर्व लहान मोठ्या गावात हे मासिक आम्हाला पहावयास मिळते. मासिकामुळे विविध गुरुभगवंताचे लेख, महाराष्ट्रातील विशेष बातम्या समजतात. जैन जागृति मासिक प्रकाशनाद्वारे श्री. संजयजी व सौ. सुनंदा चोरडिया समाज बांधवाची उत्कृष्ट सेवा करुन प्रगतीचे उच्चतम शिखर गाठवण्यासाठी शुभाशिर्वाद देत आहोत.

अध्यक्ष श्री. बाळासाहेब धोका यांनी जैन जागृतिची माहिती देताना सांगितले की जैन समाज हा दरमहा जैन जागृति मासिकाची आतुरतेने वाट पहात असतो. आमच्या सारखे कार्यकर्ते जैन जागृति मासिकात आपली, संघाची, संस्थेची बातमी प्रसिद्ध झाली का? त्यात आपले नाव आले आहे का? हे बारकाईने पहातो. अंकात बातमी आल्याने कार्यकर्त्यांना आपण करीत असलेल्या कार्याचे समाधान, आनंद मिळते. जैन जागृति मासिकात बातमी आली की संपूर्ण महाराष्ट्रात पोचते. या मासिकात जे जे चांगले आहे अशा सर्व बातम्या प्रकाशित होतात. वादग्रस्त बातम्यांना या अंकात स्थान नसते. श्री. कांतीलालजीच्या स्वर्गवासा नंतर श्री. संजयजी चोरडिया व सौ. सुनंदा चोरडिया यांनी अतिशय उत्तमरित्या मासिक प्रकाशित केले आहे. काळानुसार मासिकात बरेच बदल केले आहे. अशा कार्यक्षम संपादकांना पुरस्कार प्रदान करताना आम्हाला फार आनंद होत आहे.

सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर व उद्योगपती श्री. अभयजी संचेती यांनी सांगितले की श्री. कांतीलालजी चोरडिया यांनी जैन जागृति मासिकाची सुरुवात नाना पेठ येथील लहान घरातून केली. आम्ही पण याच वाड्यात रहात असल्याने श्री. कांतीलालजींना व चोरडिया परिवाराला अगदी जवळून पाहिले आहे. ते जैन धर्माचे गाढे अभ्यासक व शिस्तबद्ध होते. मासिक प्रचारासाठी त्यांनी फार परिश्रम घेतले, अनेक व्याख्याने दिली. त्यांच्या या पुरुषार्थाने जैन जागृति मासिक नावारुपाला आले. त्यांच्यानंतर श्री. संजयजी चोरडिया व सौ. सुनंदाभाभी यांनीही आपल्या परिश्रमाने जैन जागृतिच्या नावारुपात भर घातली आहे. काळानुसार जैन जागृति मासिकात अंतर्बाह्य बदल व्हाईटपेपर, कलर छपाई, वेबसाईट इ. बदल केले आहेत. श्री. संजय व सुनंदा भाभीनी त्यांच्या आईची स्व. चंचलबाई यांची फार चांगली सेवा केली हे मी जवळून पाहिले आहे. मातापिताचे त्यांना भरपूर आशीर्वाद असल्याने ते सर्व क्षेत्रात प्रगती करीत आहेत. त्यांचा मुलगा सागर IIT बॉम्बे येथून गोल्ड मेडल मिळवून उत्तीर्ण झाला व अमेरिकेत फेसबुक कंपनीत उच्चपदावर कार्य करीत आहे. यांची सून सौ. प्राची गुगल कंपनीत कार्यरत आहे. चोरडिया परिवाराने आपले नाव भारताबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर ही यशस्वीपणे झळकवले आहे. त्यांच्या या सर्व कार्यास शुभेच्छा देतो.

नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले यांनी जैन जागृति बद्दल गौरवोद्गार काढताना सांगितले की संपूर्ण समाज

जैन जागृति मासिकाची चातकासारखी वाट पहात असतो. गत ४८ वर्षात एक ही अंकाचा खाडा न होता दरमहा हे मासिक वेळेवर प्रसिद्ध होत आहे. यात सर्व संप्रदायाच्या गुरुभगवंताचे लेख, बातम्या प्रसिद्ध होत असल्याने हे मासिक सर्व समाजाला आपले वाटते. त्यांचे हे कार्य समाजासाठी फार महत्त्वाचे आहे. जैन जागृतित प्रसिद्ध होणारी दीपावली पूजन विधीवरुन संपूर्ण जैन समाज दीपावलीची पूजा करीत आहे. या अंकाला फार मोठी मागणी समाजाकडून असते. त्यांच्या या सर्व कार्यास मी शुभेच्छा देतो.

जैन जागृतिच्या संपादिका सौ. सुनंदा चोरडिया यांनी यावेळी सांगितले की हा आमचा सन्मान आम्ही जैन जागृतिचे संस्थापक स्व. कांतीलालजी चोरडिया व मातोश्री स्व. चंचलबाई चोरडिया यांना समर्पित करीत आहोत. जैन जागृति गत ४८ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होत आहे याला गुरु भगवंताचे आशिर्वाद व समाजबांधवाचे सहयोग सातत्याने मिळत आहे. उत्कृष्ठ साहित्य, सर्व संप्रदायाच्या विशेष बातम्या, आकर्षक छपाई, महाराष्ट्रात जैन जागृति मासिक प्रतिनिधीचे जाळे, नियमितपणा, हजारो ग्राहक व वाचक इ. गुणांमुळे जैन जागृति मासिक जैन समाजात लोकप्रिय आहे. जैन जागृतिचा हा विशेष सन्मान केल्याबद्दल संघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब धोका व सर्व पदाधिकाऱ्याचे आम्ही आभारी आहोत.

कार्यक्रमानंतर श्री. विनोदजी गांधी व त्यांच्या परिवारातर्फे सर्वांना गौतमप्रसादी देण्यात आली. ●

---

## संचेती ट्रस्ट, पुणे
## चि. तनिषा चोपडा – सत्कार




पुणे – स्व. इंदुमती बन्सीलालजी संचेती ट्रस्ट व ओम गुरु आनंद गौशाळा मावडी (पिसर्वे) यांच्या वतीने रिदमिक जिम्नॅस्टिक्स या खेळात आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे प्रतीनिधीत्व करणारी तनिषा नितीन चोपडा (वय ११) यांचा सत्कार करण्यात आला.

तनिषा चोपडा हिने तीन वेळा राज्यस्तरिय स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. त्यामध्ये तिने केलेल्या कामगिरीवरुन तिची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. त्या बद्दल तिचा संचेती ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना संचेती ट्रस्टचे प्रमुख अभय संचेती यांनी सांगितले की तनिषाचे हे कर्तृत्व देशाची मान उंचावणारे आहे. जैन समाजातील मुले व्यवसाय, तसेच प्रशासकिय सेवेत अग्रेसर होत आहेत. त्या बरोबरच खेळ व राजकारण या क्षेत्राकडे देखील युवा पिढीने आपले लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. तनिषाने केलेली मेहनत व तिच्या पालकाने तिला दिलेल्या साथीमुळेच ती या स्पर्धेपर्यंत पोहचू शकली आहे.

यावेळी दि पूना मर्चंट चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष पोपटलाल ओस्तवाल यांचा देखील संचेती ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला अभय संचेती, गौरी भटेवरा, पोपटलाल ओस्तवाल, नितीन चोपडा, मोनिका चोपडा, पन्नालाल संचेती, विजय शिंगवी, कांतीलाल श्रीश्रीमाळ, आदेश खिंवसरा, बाळासाहेब धोका, कीर्तीराज दुगड, नेमीचंद सोळंकी, सुरेश वानगोता, जेठमल दाढीच, प्रवीण नहार, किरण छाजेड, हरकचंद देसरडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कव्हर तपशील - ऑगस्ट २०१७

❖ **श्रीमद् राजचन्द्रजी १५० वी जन्म जयंती – अहमदाबाद**

महान संत व अध्यात्मिक मार्गदर्शक श्रीमद् राजचन्द्रजी यांची १५० वी जन्म जयंती अहमदाबाद येथे भव्य कार्यक्रमात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी, गुरुदेव श्री. राकेशभाई, राज्यपाल श्री. ओमप्रकाशजी कोहली, गुजरातचे मुख्यमंत्री श्री. विजय रुपानी इ. अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्रीमद् राजचन्द्रजी यांच्या चिन्हाचे नाणे व तिकिट भारत सरकारने काढले. त्याचे लोकार्पण या कार्यक्रमात संपन्न झाले. यावेळी पूज्यदेव गुरुदेव श्री. राकेशभाई यांनी श्री. नरेंद्रजी मोदी यांना श्रीमद् राजचन्द्रजी यांची मुर्ति देऊन सन्मानीत केले.

❖ **गुरु आनंद कार्यक्षम पत्रकार पुरस्कार – पुणे**

जैन श्रावक संघ, आनंद दरबार, पुणे येथे गुरु आनंद कार्यक्षम पत्रकार पुरस्कार जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी व सौ. सुनंदाजी चोरडिया यांना २३ जुलै रोजी देण्यात आला. श्रमण संघीय सलाहकार प.पू. श्री दिनेशमुनिजी म.सा., डॉ. द्विपेन्द्रमुनिजी म.सा., डॉ. पुषेन्द्रमुनिजी म.सा. यांच्या निश्रेत आमदार श्री. भिमरावजी तापकीर, नगरसेवक श्री. मोरे, श्री. बेलदरे, सौ. कोंढरे, नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले, श्री. अभयजी संचेती, संघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब धोका यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

❖ **श्री प्रीतिसुधाजी म.सा. – अमृत महोत्सव**

वाणीभूषण श्री प्रीतिसुधाजी म.सा. यांचा अमृत महोत्सव १ ऑगस्ट २०१७ रोजी भव्य कार्यक्रमात बिबवेवाडी, जैन स्थानक, पुणे येथे साजरा करण्यात आला.

अमृत महोत्सवानिमित्त वाणीभूषण श्री प्रीतिसुधाजी म.सा. यांची विशेष मुलाखत जैन जागृतिच्या अंकात पान नं. १९ वर छापलेली आहे.

❖ **ओम जय आनंद डायलेसिस सेंटर – थेरगाव**

जैन कॉन्फरन्स पंचम झोनच्या कार्यकारिणी सदस्याच्या वतीने डांगे चौक, थेरगाव येथे ओम जय आनंद डायलेसिस सेंटर उभे करण्यात आले. याचे उद्घाटन प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा. यांच्या सान्निध्यात कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. मोहनलालजी चोपडा व या उपक्रमास मोफत जागा देणारे श्री. अशोकजी सुराणा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोबत उद्योगपती श्री. पारसजी मोदी, महामंत्री श्री. अशोकजी पगारिया, श्री. आदेशजी खिंवसरा, श्री. प्रफुलजी कोठारी, श्री. विलास पगारिया, श्री. सागर सांकला इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **आनंदऋषिजी हॉस्पिटल – अहमदनगर**

अहमदनगर येथील आनंदऋषिजी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत डिजिटल सोनोग्राफी मशिनचे लोकार्पण जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. शर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी श्री. सतिश बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, प्रेस क्लबचे अध्यक्ष श्री. मन्सूर शेख, श्री. महेश महाराज देशपांडे, श्री. सतिश लोढा इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **जैन संथारा भूमी – पुणे**

नवी पेठ, पुणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत पुणे मनपाच्या वतीने स्व. जैन साध्वी प.पू. इंद्रकंवरजी म.सा. यांच्या नावाने संथारा भूमी निर्माण करण्यात आली आहे. या संथारा भूमीचे लोकार्पण महापौर सौ. मुक्ताताई टिळक, शहर सुधारणा समितीचे अध्यक्ष मा. श्री. महेश लडकत, नगरसेविका सौ. रेश्मा भोसले, सौ. सरस्वती शेंडगे, स्मिता वस्ते,

नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले, श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. अचल जैन, श्री. संजय चोरडिया, श्री. विजय मर्लेचा, श्री. नरेंद्रजी सोळंकी, श्री. आदेश खिंवसरा, श्री. बाळासाहेब धोका, श्री. विलास राठोड, श्री. दिलीप चोरबेले, श्री. अनिल गेलडा, श्री. अनिल भन्साळी, श्री. सतिश शहा इ. मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

❖ **संचेती ट्रस्ट, पुणे**

स्व. इंदूमती बन्सीलालजी संचेती ट्रस्ट व ओम गुरु आनंद गौशाला मावडी यांच्या वतीने रिदमिक जिम्नॅस्टिक्स या खेळात आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे प्रतिनिधीत्व करणारी तनिषा नितिन चोपडा हिचा सत्कार संचेती ट्रस्टचे प्रमुख श्री. अभयजी संचेती, चेंबरचे अध्यक्ष श्री. पोपटलालजी ओस्तवाल, सौ. गौरी भटेवरा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी श्री. नितिन चोपडा, सौ. मोनिका चोपडा, श्री. पन्नालालजी संचेती, श्री. नेमीचंदजी सोळंकी, श्री. आदेश खिंवसरा, श्री. किर्तीकुमार दुगड, श्री. बाळासाहेब धोका, श्री. हरकचंदजी देसर्डा इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **सुर्यदत्ता नॅशनल स्कूल, पुणे – सन्मान**

पुणे : 'आय क्यूब' ने घेतलेल्या 'ऑल इंडिया ओपन इंटेलिजन्स स्कॉलरशिप एक्झॅमिनेशन २०१६-१७' परीक्षेत 'सूर्यदत्ता नॅशनल स्कूल' च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या असाधारण कामगिरीच्या जोरावर 'सुपर मेरिटोरियस लीग' हा उच्च सन्मान प्राप्त केला.

'सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स' चे शिक्षण अधिष्ठाता डॉ. संजय चोरडिया यांना त्यांच्या शाळेच्या कामगिरीसाठी 'हाय आयक्यू' प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

❖ **अरिहंत जागृति मंच, पुणे**

पुणे-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील 'सेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासन' गेली अनेक वर्षे कार्यरत होते. सध्या सदरचे अध्यासन कार्यरत नाही. त्या विषयी जैन अध्यासन पुनश्च व्यवस्थित कार्यरत व्हावे, यासाठी आवश्यक ती कार्यवाही लवकरात लवकर करावी अशी मागणी करणारे निवेदन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीनजी करमळकर यांना अरिहंत जागृती मंच, पुणे तर्फे दि. २० जुलै रोजी देण्यात आले. याप्रसंगी अरिहंत जागृती मंचचे सर्वश्री राजेंद्र सुराणा, विजय पारख, शांतीनाथ जैन, संतोष भन्साळी, संजय दोशी, जवाहर गुमटे, प्रशांत ढोले आदि सदस्य उपस्थित होते.

❖ **श्री. निर्मय महेंद्रजी छाजेड – पुणे**

पुणे – ''डिलीव्हरीग चेंज फाऊंडेशन'' च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व्यासपीठाने आयोजिलेल्या ''यिन समर युथ समिट २०१७'' मध्ये शिक्षण, सामाजिक, कला, क्रिडा, नेतृत्व आणि स्टार्ट-अप क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या युवकांना ''यिन इन्स्पिरेटर्स'' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

सदर कार्यक्रमात ''स्टार्ट अप'' क्षेत्रामध्ये पुणे येथील श्री. महेंद्रजी भागचंदजी छाजेड यांचे सुपुत्र श्री. निर्मय छाजेड यांना महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री मा. श्री. विजय शिवथारे यांच्या हस्ते युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

❖ **सॉलीटिअर वर्ल्ड, पुणे – पुरस्कार**

बिबवेवाडी, पुणे येथे सॉलीटिअर वर्ल्ड या भव्य स्किमला दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार Asia Pacific Property Awards, for 'Best Mixed-use Development' & 'Best Architecture.' मिळाले. श्री. अतुलजी अशोकजी चोरडिया यांनी हा पुरस्कार थायलंड येथे स्विकारला.